दीपावली - उत्सव प्रकाशाचा, उत्सव आनंदाचा

प्रकाश व अंधार हे एकमेकांबरोबर जात नाहीत, तसेच भीती व आनंद हेही बरोबर नांदू शकत नाहीत. म्हणून वर्षातून एकदा का होईना, लख्ख प्रकाशाने उजळलेले वातावरण, योजनापूर्वक तयार केलेले खाण्याचे पदार्थ, शरीराने साथ द्यावी यासाठी चंदन-हळदीचे उटणे, बरोबर मसाजसाठी सुंदर सिद्ध केलेले अभ्यंग तेल, अशा तऱ्हेची योजना करून कुठल्याही प्रकारची भीती आजूबाजूला फिरकू न देण्याची योजना दीपावलीच्या काळात केलेली असते.



सध्या स्वच्छता अभियानाचा खूप बोलबाला आहे. परंतु स्वच्छतेचा पाया हा भारतीय परंपरेने दीपावलीच्या निमित्ताने घातलेला आहे. दीपावलीच्या काळात प्रकाश प्रकर्षाने वाढविला जातो, जेणेकरून साफसफाई नीट झालेली आहे की नाही हे सहजपणे दिसावे. साफसफाईचे महत्त्व आपल्याला सणाने घालून दिलेले आहे. सणवारी बहुतेक मंदिरेही स्वच्छ दिसतात. असा हा दीपावलीचा म्हणजेच प्रकाशाचा उत्सव. म्हणून अमावस्येच्या काळोख्या रात्री आकाश उजळून निघावे या हेतूने आकाशदिवे लावले जातात किंवा वर आकाशाकडे झेपावणारी आतषबाजी केली जाते. अशा अमावस्येच्या दिवशी केली जाते लक्ष्मीची पूजा. या दिवशी लक्ष्मीचे प्रतीक म्हणून पैशाची, सोन्याची, हिशेबाच्या वह्यांची पूजा केली जाते. परंतु अमावस्येच्या काळ्या रंगात काळा पैसा-लक्ष्मी कधीच प्रकट होत नाही. शेवटी श्रमप्रतिष्ठा ठेवून ज्याचे काम केले त्याचाही फायदा आणि ज्याने काम केले त्याचाही फायदा अशी सर्वांचे कल्याण असणारी कार्यपद्धती सांभाळून श्रमाने मिळविलेल्या पैशातील लक्ष्मी सहजपणे प्रकाशरूपाने प्रकट होते. सरते शेवटी अशी लक्ष्मीच समृद्धी प्रदान करून माणसाला सुख, समाधान देऊन समाधीपर्यंत आनंद देते. अलक्ष्मी-काळी लक्ष्मी, ज्यात प्रकाशकिरणच नाही ती अमावस्येलाही दिसणार नाही कारण त्यात जराही श्रमाचे तेज लपलेले नसते. दुसऱ्याला नडवून, फसवून जमविलेला पैसा ही लक्ष्मी नव्हे. अशा लक्ष्मीने मिळविलेल्या सुखाची बेरीज-वजाबाकी करताना बाकी शून्य कधीच येत नाही, उणेच राहतो; म्हणजे अशा लक्ष्मीचा उपयोग सुखासाठी कधीच करता येत नाही, तिचा उपयोग केवळ संग्रहासाठी करता येतो. संग्रह नेहमीच भीती वाढवतो, कारण संग्रह चोरीला जायची भीती असते.

सेंद्रिय अन्नाचा वापर

अशा स्वच्छतेच्या, प्रकाशाच्या व आनंदाच्या या दीपावलीच्या उत्सवात आपण केवळ आपल्यापुरतेच पाहणार का? केवळ स्वार्थाचाच विचार करणार का? की एकूणच आपल्या आजूबाजूचा परिसर, आपले गाव स्वच्छ राहावे यासाठी काही स्वच्छता अभियान राबवणार? प्रत्येकाने फक्त रस्त्यावर पडलेला कचरा झाडणे म्हणजे स्वच्छता अभियान राबविणे नव्हे. सर्व प्रकारची स्वच्छता अभिप्रेत असावी. पाण्यामध्ये वनस्पती वाढू देणे, शेवाळं धरू देणे, विघटन न होणाऱ्या वस्तू पाण्यात विसर्जन करणे यामुळे नद्यांच्या-जलाशयांच्या स्वच्छतेला बाधा येते, म्हणून हे कटाक्षाने टाळावे. अशुद्ध वस्तूंचे ज्वलन होण्यामुळे हवेचे प्रदूषण होते. शेतात अति प्रमाणात रासायनिक खते टाकण्याने तसेच पिकांवर विषारी कीटकनाशके फवारल्यामुळे नुसते वातावरणाचे नाही तर अन्नाचेही प्रदूषण होते. घरात आणलेले धान्य धुवून व निवडून घेतले तरी धान्य तयार होत असतानाच विषारी घटक आले असले तर नुसत्या धुण्यामुळे निघून जाऊ शकतील का याचा विचार करणे आवश्यक आहे. म्हणून शक्यतो सेंद्रिय अन्नाचा वापर करणे हेही एक प्रकारचे स्वच्छता अभियानच होईल.

दीपावलीचा प्रारंभ

दीपावलीची सुरुवात ही बछड्याबरोबर असलेल्या गाईच्या पूजनाने होते. माणसातील पशुत्व बदलून त्याला पूजनीय स्थानावर आणले जाते याची आठवण म्हणून हे गोवत्स द्वादशीचे पूजन - वसुबारस. सर्व प्राणिमात्रांचे प्रथम अन्न असलेल्या दुधाची व्यवस्था आईकडून होते तशीच गाईकडूनही होते. त्यामुळे गाईचे संरक्षण करणे, तिची काळजी घेणे आवश्यक होय. गाय मनुष्याला दूध देते, जे मनुष्याला सहज पचते, ज्यापासून मनुष्याचे संपूर्ण शरीर तयार होते, वीर्योत्पत्ती होते. अशा गाईचा आपल्या कुटुंबात स्वीकार करून तिला आपल्या जीवनात स्थान दिले आहे. पाळीव प्राणी बरेच आहेत, परंतु प्रत्येक पाळीव प्राण्याबरोबर राहणे नेहमीच सुखकारक नसते. आदिमानवाला लक्षात आलेली पहिली गोष्ट म्हणजे डोक्यावर हवे छत व अत्यंत सुरक्षित जागा. त्यामुळे त्याने राहती जागा बंद करून तिला दारे व खिडक्या यांचे नियोजन केले. त्याचप्रमाणे त्याला वाहनाची व अवजारांची आवश्यकता भासली. त्यामुळे वाहन, अवजारे, अन्नधान्य, औषधे यांना जीवनात एक मोठे स्थान मिळून त्यांची पूजा करण्याचा प्रघात सुरू झाला. ही धन्वंतरी जयंती. एवढे केल्यानंतर मनुष्य ज्या शरीराच्या आधारावर जगणार त्या शरीराची काळजी घेण्यासाठी व त्याला आरोग्यवान ठेवण्यासाठी निसर्गाने व परमेश्वराने पाठवले श्री. धन्वंतरी-देवांचे वैद्य. वनातील धनाची, वनस्पती, धान्ये, खनिज संपत्ती वगैरे सर्वांची पूजा हीच धन्वंतरींची पूजा.

उरला सुरला वाईटपणा, षड्रिपूंचा अंश नष्ट करून त्यांच्या नावाने स्नान करून, नूतन वस्त्र धारण करून जणू नवे जीवन सुरू करण्यासाठी असतो नरकचतुर्दशीचा दिवस. यानंतर महत्त्व येते ते जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या शक्तीचे, मग ती शरीरांतर्गत असो किंवा शरीराच्या बाहेर असो, अप्रकट भौतिक स्वरूपात असो किंवा भौतिक माध्यमातून प्रकट होणारी असो, मनाची शक्ती असो वा आत्म्याची शक्ती असो. ही शक्ती म्हणजे लक्ष्मी, जिच्या आधारावर जीवन सातत्याने निरंतर चालू शकते तिचे पूजन करण्याचा लक्ष्मीपूजनाचा दिवस. याच शक्तीची तीनपैकी आणखी दोन रूपे, ज्ञानशक्तीची महासरस्वती, संरक्षण आणि नाशासाठी महाकाली.

अशा प्रकारे एका उच्च अशा जीवनपद्धतीचा स्वीकार करून सर्वांबरोबर आनंद, समृद्धी अनुभवण्याचा दिवस हा दीपावलीतील बलिप्रतिपदा - पाडव्याचा दिवस. हा आनंद लुटत असताना हेही लक्षात ठेवायला हवे की, दिव्याखाली अंधार अशा पद्धतीने बाहेर समाजसेवा पण घरच्या भाऊबंदांकडे, भाऊबहिणींकडे लक्ष न देता त्यांच्याशी वितुष्ट हा प्रकार योग्य नाही हे लक्षात घेऊन बहीण-भावांमधील प्रेम व्यक्त करण्याचा व कुटुंबसौख्याचा दिवस म्हणजे भाऊबीज.

हे सर्व चक्र सुरू ठेवण्यासाठी शेवटी येते ते तुळशीचे लग्न. अशा प्रकारे भारतीय परंपरेने तयार केलेली भारतीय संस्कारांची, भारतीय सणावारांची समृद्धी. हीच वेदपरंपरा. कर्मकांड करत असताना त्यामागच्या भावना लक्षात ठेवून ते करणे महत्त्वाचे. प्रदूषण होईपर्यंत धूर होईल, किंवा कानठळ्या बसतील एवढ्या आवाजाचे फटाके उडवायचे, आगी लागतील अशा प्रकारे आतषबाजी करणे हेही बरोबर नव्हे; पण चार फटाक्यांचे आवाज झाले, तेजःपुंज प्रकाशाची उधळण झाली तर हरकत नसते. या ऋतूत काही अंशी हवेत राहिलेले बाष्प, हवेत राहिलेला दमटपणा, काही कीटक, यांना घालविण्यासाठी फटाक्यांचा उपयोग होऊ शकतो. लहान मुलांच्या हातात धरायच्या फुलबाज्या उडवायला हरकत नसावी. अशा प्रकारे जो आनंद सर्वजण अनुभवतात व जे फटाके आत फुटत आहेत त्यांचे बाहेरचे प्रकटीकरण करण्यासाठी दीपावलीचा हा सण. आतील आनंद बाहेर व्यक्त करण्यासाठी वेगवेगळे उपचार केले जातात. अर्थात बाहेरच्या फटाक्यांवर, त्यांच्या आवाजावर जास्त अवलंबून राहण्यापेक्षा प्रत्येकाच्या मनात आनंदाचे जे फवारे उठतील त्यामुळेच खरी दीपावली साजरी होईल.

या दीपावलीत सर्वांना ज्ञानप्रकाश, सुखसंपदा, धनधान्य, आरोग्य, कल्याण, मैत्री व शांती लाभून दीपावली व नूतन संवत्सर सर्वांसाठी मंगलमय होवो हीच प्रार्थना.

(श्रीगुरू डॉ. बालाजी तांबे यांच्या लेखन, व्याख्यान, निरूपणांतून संतुलन आयुर्वेदद्वारा)

प्राध्यापक भरतीला वेग; शंभर पदांना ना हरकत

८४ महाविद्यालयांतील ४७२ पदांच्या प्रस्तावांची छाननी

छत्रपती संभाजीनगर, ता. ५ : आचारसंहितेमुळे रखडलेल्या प्राध्यापक भरती प्रक्रियेला आता गती मिळाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील चार जिल्ह्यांमधील महाविद्यालयांत प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्यासाठी उच्चशिक्षण विभागाने हालचाली सुरू केल्या आहेत. आतापर्यंत २० संस्थांमधील १०० पदांच्या भरतीसाठी ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) दिले आहे.

विभागाकडे ८४ महाविद्यालयांकडून एकूण ४७२ पदांच्या भरतीसाठी प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यांची छाननी करून सामाजिक आणि समांतर आरक्षणाच्या नियमांचे पालन होत असल्याची खातरजमा केली जात आहे. त्यानुसार पात्र संस्थांना टप्प्याटप्प्याने ना हरकत प्रमाणपत्र दिले जात आहे. त्यानुसार १०५ पदांचा प्रस्ताव मंत्रालयीन स्तरावर मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहेत. ना हरकत प्रमाणपत्र मिळालेल्या संस्थांना आता रिक्त पदांची जाहिरात प्रसिद्ध करून भरती प्रक्रिया सुरू करता येणार आहे. जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर साधारण महिनाभरात उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्याची प्रक्रिया अपेक्षित आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून भरतीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

> चार जिल्ह्यांतील महाविद्यालयांच्या प्राध्यापक भरतीला गती देण्यात येत आहे. सामाजिक व समांतर आरक्षणाचे नियम तपासूनच संस्थांना ना हरकत प्रमाणपत्र दिले जात आहे. प्रमाणपत्र मिळालेल्या महाविद्यालयांना जाहिरात काढून पदभरती सुरू करण्यास परवानगी आहे.
> **- डॉ. पंकजा माधव वाघमारे,**
> सहसंचालक, उच्चशिक्षण विभाग

लक्ष्मणराव यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

नवी दिल्ली, ता.५ : दिल्लीतील ज्येष्ठ मराठी साहित्यिक लक्ष्मणराव चहावाले यांच्या 'समृद्ध पत्रकारिता' या पुस्तकाचे आज प्रकाशन झाले. दिल्लीत संचालक धीरज भूषण यांच्या हस्ते, अन्न व पेय विभागाचे संचालक पीयूष भूषण यांच्या उपस्थितीत हा समारंभ पार पडला. 'समृद्ध पत्रकारिता' हे लक्ष्मणराव यांचे तिसावे पुस्तक असून, पत्रकारितेची मूल्ये, सामाजिक जबाबदारी, आधुनिक पत्रकारितेतील विविध पैलूंचा ऊहापोह केला आहे.

SHRI GURU GOBIND SINGHJI INSTITUTE OF ENGINEERING & TECHNOLOGY, NANDED-431606

File No.SGGSIE&T/Stores-3661(A)/ICMS-Integrated cloud-based ERP Software solution/I.T.- Services/2026-27. Date: 06/11/2026

E-TENDER NOTICE

Director, Shri Guru Gobind Singhji Institute of Engineering & Technology, Vishnupuri, Nanded invites online e-tender for ***"Request for proposal (RFP) Institute Campus Management System (ICMS) Integrated cloud-based ERP software solution for I.T. Services of SGGSIE&T, Nanded".***

Sr. No.	Name of Service/goods	Online Tender ID.
1	"Request for proposal (RFP) Institute Campus Management System (ICMS) Integrated cloud-based ERP software solution for I.T. Services of SGGSIE&T, Nanded"	2026_DTEDM_1350504_1

The tender documents are available on portal **https://mahatenders.gov.in** from **06/11/2026.** Last date for purchase of e-tender documents and bid submission up to **07/12/2026** for detailed tender notice bidder can also visit Institute web site **https://www.sggs.ac.in**

Sd/-
DIRECTOR

राहुल यांच्यामुळे बहिष्काराची संस्कृती

केंद्रीय गृहमंत्री शहा यांची टीका; हरियानातील मोर्चात सहभाग

कर्नाल, ता. ५ (पीटीआय) : संसदेत गदारोळ घालणे, कामकाजावर बहिष्कार घालणे हीच राहुल गांधी यांनी काँग्रेसची संस्कृती बनविली आहे, अशी टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केली. 'इंडिया' आघाडीची घुसखोरांना संरक्षण देण्याची भूमिका आहे, असा आरोप करत मतदार यादीतून घुसखोरांना काढण्याचा भाजपचा निर्धार आहे, असेही त्यांनी सांगितले. भाजपने आयोजित केलेल्या 'लोकशाही वाचवा, अराजकता हटवा' या मोर्चानंतरच्या सभेत ते बोलत होते. हरियानाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी, केंद्रीय मंत्री मनोहरलाल, भाजपचे हरियाना प्रदेशाध्यक्ष अर्चना गुप्ता आदी उपस्थित होते.

लोकशाहीत संसद हेच चर्चेचे सर्वोच्च स्थान आहे, असे नमूद करत शहा म्हणाले, की राहुल गांधी संसदेचे कामकाज सुरळीत चालू देत नाहीत. ते संसदेत चर्चा करत नाहीत. राहुल गांधी यांनी गदारोळ आणि बहिष्काराला काँग्रेसची संस्कृती बनविले आहे. मात्र अशा युक्त्यांमुळे देशाची ८० वर्षांची लोकशाही नष्ट होईल, असे त्यांना वाटते का? आम्ही रस्त्यावरचे लोक आहोत. त्यामुळे माझ्या म्हणण्याची दखल घ्या. भाजप तुम्हाला संसद, विधानसभा, गावांत सर्वच ठिकाणी चोख प्रत्युत्तर देईल, असा इशाराही शहा यांनी दिला. 'इंडिया' आघाडीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्यासाठी सुरू केलेल्या आंदोलनाच्या प्रत्युत्तरादाखल भाजपनेही 'लोकशाही वाचवा, अराजकता हटवा' मोहीम सुरू केली.

'अंबाला हे स्वातंत्र्यसमराचे केंद्रस्थान'

अंबाला (हरियाना) (एएनआय) : ''अंबाला हे भारताच्या ब्रिटिशांविरुद्धच्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाचे पहिले केंद्र असून, त्या ठिकाणी उभारलेले हे नवे स्मारक देशभरातील तरुणांसाठी देशभक्तीची प्रेरणा देणारा दीपस्तंभ ठरेल,'' असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी केले. अंबाला छावणी परिसरात अत्याधुनिक सुविधांनी युक्त अशा १८५७ हुतात्मा स्मारकाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

हरियानाच्या ६० व्या वर्धापनदिनानिमित्त गांधी मैदानावर आयोजित जाहीर सभेला संबोधित करताना शहा यांनी अंबाल्याच्या ऐतिहासिक भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच १८५७ च्या स्वातंत्र्य समराचा उल्लेखही केला. अंबाला छावणीतील स्मारकाची वैशिष्ट्ये अधोरेखित करताना शहा यांनी त्यात अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक वारशाचा मिलाफ करण्यात आल्याचे सांगितले. ''या स्मारकात आभासी दालने, होलोग्राफी आणि संवादात्मक प्रक्षेपण यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. त्याचबरोबर ऐतिहासिक दस्तऐवजांचाही समावेश करण्यात आला आहे. हरियाना येथे सादर होणारा प्रकाश, ध्वनी कार्यक्रम आपल्याला १८५७ च्या काळात घेऊन जातो,'' असे ते म्हणाले.

'परदेश दौऱ्यांची माहिती द्या'

मतदारयाद्यांच्या विशेष सखोल फेरपडताळणीवर (एसआयआर) चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलविण्याच्या प्रस्तावाचाही अमित शहा यांनी पुनरुच्चार केला. राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यांची माहिती देण्याची मागणीही त्यांनी केली. ते लोकसभेचे विरोधी पक्षनेते आहेत. लोकांना त्यांच्या परदेश दौऱ्याबद्दल जाणून घेण्याचा अधिकार आहे, असे त्यांनी सांगितले.

MAHATMA GANDHI MISSION
MGM Campus, N-6, CIDCO, Chh.Sambhajinagar - 431003, Tel.0240-6482930/27

E-TENDER NOTICE

The E-Tenders are invited under e-Tendering system from manufacturers, manufacturer appointed distributors, established and reliable Vendors for supply of **"Lab Equipments, Instruments Consumables & IT Equipment".**

Interested Manufacturers & vendors can download tender from https://mgmmcha.org/tender the Final Quotations & documents should be emailed at **etender@mgmmcha.org** before 12.11.2026 till 5.00 p.m.

The management reserves the right to accept or reject all offers or in part without assigning any reason whatsoever.

Date : 06.11.2026 C.E.O.

..तर पुणे मेट्रोच्या उभारणीला दशके लागली असती!

नवी दिल्ली, ता. ५ : पुणे मेट्रोच्या कामात पूर्वीच्या सरकारांनी केलेल्या दिरंगाईविषयी रोष व्यक्त करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी '२०१४ पूर्वीच्या वेगाने पुणे मेट्रोच्या उभारणीचे काम झाले असते तर ते पूर्णत्वाला जाण्यासाठी दशके लागली असती', अशी टीका आज केली.

केंद्रातील भाजप सरकारच्या काळात बारा वर्षांमध्ये भारतातील २६ शहरांमध्ये मेट्रो रेल्वेचे जाळे सुमारे पाच पटींनी विस्तारून बाराशे किलोमीटरवर गेल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. 'एक्स'वर केलेल्या पोस्टमध्ये पुणे मेट्रोचा संदर्भ देत मोदी यांनी मेट्रो रेल्वेच्या उभारणीच्या बाबतीत २०१४ पूर्वीची आणि आजच्या स्थितीची तुलना केली. ''मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो. २०१४ पूर्वी ज्या वेगाने भारताचे मेट्रोचे जाळे विस्तारत होते, त्याच वेगाने ते पुढे जात राहिले असते तर पुण्यासारख्या शहरांमध्ये मेट्रो येण्यासाठी आणखी किती वाट पाहावी लागली असती? वर्षे... नाही... कदाचित दशके आणि हे स्वीकारार्ह नव्हते.'' ''भारतात २०१४ मध्ये पाच शहरांमध्ये मिळून फक्त २४८ कि.मी. एवढे मेट्रोचे जाळे होते. आज, २६ शहरांमध्ये मिळून बाराशे किमीच्या जवळ हा विस्तार पोहोचला आहे. दररोज एक कोटींहून अधिक नागरिक मेट्रोने प्रवास करतात. हा परिणाम आकडेवारीपुरता मर्यादित नाही तर वाहतूक कोंडीत कमी वेळ जाणे, कुटुंबासोबत वेळ घालविणे, कार्यक्षमता वाढणे, असा याचा अर्थ आहे. शहरी भारतासाठी परिवर्तनाच्या दिशेने आम्ही कार्यरत आहोत!''असे मोदी यांनी नमूद केले आहे.



अमेरिकेकडून दिवाळीनिमित्त 'रांगोळी'चे टपाल तिकीट

नवी दिल्ली, ता. ५ (पीटीआय) : दीपावलीच्या प्रकाशोत्सवाचे औचित्य साधून अमेरिकेच्या टपाल विभागाने एक विशेष 'फॉरेव्हर' टपाल तिकीट प्रसिद्ध केले आहे. या तिकिटावर भारतीय संस्कृतीचे एक वैशिष्ट्य असलेली रंगीबेरंगी 'रांगोळी' चित्रीत करण्यात आली आहे. भारतातील अमेरिकी दूतावासाने 'एक्स'वर या नवीन तिकिटाची झलक प्रसिद्ध केली आहे. अमेरिकेने २०१६ मध्येही दिवाळीनिमित्त विशेष टपाल प्रसिद्ध केले होते. अमेरिकेच्या टपाल विभागाने गेल्याच वर्षी आपल्या स्थापनेची २५० वर्षे पूर्ण केली आहेत. हा विभाग त्यांच्या 'फॉरेव्हर' श्रेणीतील तिकिटांसाठी ओळखला जातो.

दिवाळी फॉरेव्हर तिकिटांच्या माध्यमातून अंधारावर प्रकाशाच्या विजयाचा हा उत्सव साजरा करा, असे या तिकिटाबाबतच्या टिपणीत दूतावासाने नमूद केले आहे. अमेरिकेतील भारतीय समुदायाची वाढती संख्या आणि त्यांचा तेथील समाजजीवनावर असलेला प्रभाव या निर्णयामागे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. फॉरेव्हर श्रेणीतील टपाल तिकिटांचे वैशिष्ट्य असे की, ही तिकिटे खरेदी केल्यानंतर भविष्यात टपाल दरात कितीही वाढ झाली, तरी ती प्रथम श्रेणीच्या पत्रांसाठी वापरता येतात.

लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: एम 130-131, दुसरा मजला, एम-42, कॅनॉट सर्कल, शंकर मार्केट, ब्लॉक एम, कॅनॉट प्लेस, नवी दिल्ली – 110001
सीआयएन: U42201DL2025GOI459301

जाहीर सूचना
लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेडच्या पारेषण परवाना मंजुरीसाठीच्या अर्जावर सूचना/हरकती मागविण्याबाबत (प्रकरण क्र. 225 / 2026)

1. लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेड (एलआरटीएल) यांनी विद्युत अधिनियम, 2003 मधील कलम 14 आणि 15 तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, 2004 मधील तरतुदींनुसार पारेषण परवाना मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे अर्ज दाखल केला आहे. आयोगाने दिनांक 04 नोव्हेंबर 2026 रोजी सदर अर्ज दाखल करून घेतला असून, विद्युत अधिनियम, 2003 च्या कलम 15(2) अंतर्गत सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश एलआरटीएल यांना दिले आहेत.
2. लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेडची स्थापना "400/220/132 केव्ही एआयएस लातूरची उभारणी" (यापुढे "प्रकल्प") या आंतरराज्यीय पारेषण प्रणालीच्या उभारणीसाठी विशेष उद्देश वाहन म्हणून करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील लातूर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांमधील वीज पारेषण क्षमता वाढण्यास तसेच पारेषण पायाभूत सुविधांची विश्वासार्हता सुधारण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र शासनाने बोली प्रक्रिया समन्वयक म्हणून अधिसूचित केलेल्या पीएफसी कन्सल्टिंग लिमिटेडमार्फत राबविण्यात आलेल्या दराधारित स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे हा प्रकल्प प्रदान करण्यात आला आहे.
3. या प्रकल्पामध्ये 400 केव्ही स्तरावर 125 एमव्हीएआर बस रिॲक्टरसह 3 x 500 एमव्हीए, 400/220 केव्ही आयसीटी आणि 3 x 315 एमव्हीए, 400/132 केव्ही आयसीटीसह एआयएस लातूरची उभारणी करणे, तसेच एआयएस लातूर ते 400 केव्ही वाशी (प्रस्तावित) दरम्यान 400 केव्ही डी/सी पारेषण वाहिनी, एआयएस लातूर ते 220 केव्ही हरंगुळ, 220 केव्ही मुरूड, 220 केव्ही वैराग आणि 220 केव्ही नारंगवाडी (सर्व विद्यमान) दरम्यान 220 केव्ही डी/सी पारेषण वाहिन्या, सौर ऊर्जा निर्मिती केंद्रांसाठी 220 केव्ही जोडणी आणि एआयएस लातूर ते 220 केव्ही तुळजापूर आणि 132 केव्ही औसा (दोन्ही विद्यमान) दरम्यान 132 केव्ही डी/सी पारेषण वाहिन्यांची उभारणी यांचा समावेश आहे. मॉटेकॅर्लो एनर्जी लिमिटेड (एमईएल) ही निविदा प्रक्रियेनंतर यशस्वी निविदाकार ठरली असून, अर्जांमध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर तिने लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेडचे संपूर्ण इक्विटी भागभांडवल अधिग्रहित केले आहे. महाराष्ट्र राज्यातील सदर आंतरराज्यीय पारेषण प्रणालीची उभारणी, संचालन आणि देखभाल करण्यासाठी पारेषण परवाना प्राप्त करणे आवश्यक असल्याने एलआरटीएल यांनी पारेषण परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.
4. आयोगाने या सूचनेद्वारे पारेषण परवाना मंजुरीसाठीच्या अर्जावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याचे निर्देश एलआरटीएल यांना दिले आहेत. अर्जाची प्रत तपासणीसाठी किंवा खरेदीसाठी उपलब्ध करून देणाऱ्या नोडल व्यक्तीचा संपर्क तपशील खालीलप्रमाणे आहे:

अ. **नाव:** श्री. संदीपसिंह गोहिल
ब. **अर्जाची प्रत तपासणीसाठी किंवा खरेदीसाठी उपलब्ध असलेला पत्ता:** एम 130-131, दुसरा मजला, एम-42, कॅनॉट सर्कल, शंकर मार्केट, ब्लॉक एम, कॅनॉट प्लेस, नवी दिल्ली – 110001
क. **तपासणी किंवा खरेदीसाठीची वेळ:** कामकाजाच्या दिवशी सकाळी 10:00 ते सायंकाळी 17:00 वाजेपर्यंत.
ड. ₹100/- रोख किंवा "लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेड" या नावाने मुंबई येथे देय असलेला डिमांड ड्राफ्ट/धनादेश भरून तपशीलवार अर्जाची कागदपत्रे (इंग्रजीमध्ये) सीडीसह प्राप्त करता येतील.
ई. अर्जाची प्रत विनामूल्य डाउनलोड करण्यासाठी संकेतस्थळाचा पत्ता: www.mclindia.com

5. प्रसिद्ध करण्यात आलेल्या सार्वजनिक सूचनेच्या अनुषंगाने सूचना/हरकती दाखल करू इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने त्या इंग्रजी किंवा मराठी भाषेत लेखी स्वरूपात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या संकेतस्थळावरील 'ई-पब्लिक कन्सल्टेशन' या टॅबद्वारे अपलोड कराव्यात. ही सुविधा वापरण्यात काही अडचण आल्यास संबंधित भागधारकांनी कामकाजाच्या सर्व दिवशी सकाळी 10:00 ते सायंकाळी 17:00 वाजेपर्यंत आयोगाच्या कार्यालयाशी मोबाईल क्रमांक: 8928071522 किंवा ई-मेल: suggestions@merc.gov.in यावर संपर्क साधावा.
6. 'ई-पब्लिक कन्सल्टेशन' टॅबवर सूचना व हरकती अपलोड केलेल्या व्यक्तींना त्यांच्या निवेदनाची कोणतीही छापील प्रत सादर करण्याची आवश्यकता नाही. इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करू न शकणाऱ्या व्यक्तींनी आपली सूचना किंवा हरकत छापील स्वरूपात **'सचिव', महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमईआरसी), 13 वा मजला, सेंटर क्रमांक 1, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई – 400005 या पत्त्यावर पाठवावी.** त्यासोबत वरील मुद्दा क्र. 4 मध्ये नमूद केलेल्या नोडल व्यक्तीला दिलेल्या पत्त्यावर त्याची प्रत पाठविल्याचा पुरावा जोडणे आवश्यक आहे. अशा निवेदनामध्ये पाठविणाऱ्या व्यक्तीचे पूर्ण नाव, टपालाचा पत्ता आणि उपलब्ध असल्यास ई-मेल पत्ता नमूद असणे आवश्यक आहे. **07 डिसेंबर 2026** रोजी 17:00 वाजल्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. अन्य कोणत्याही माध्यमातून दाखल केलेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.
7. लातूर आरईझेड ट्रान्समिशन लिमिटेड यांना प्राप्त झालेल्या प्रत्येक हरकती/अभिप्रायाला प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत उत्तर द्यावे लागेल. तथापि, **07 डिसेंबर 2026** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व हरकती/अभिप्रायांना **10 डिसेंबर 2026** पर्यंत उत्तर देणे बंधनकारक असेल.

ठिकाण: लातूर
दिनांक: 06 नोव्हेंबर 2026

श्री. संदीपसिंह गोहिल
(अधिकृत स्वाक्षरीकर्ता)

युद्धांच्या सावटात
भारतीय सूत्राची 'कसोटी'



निळू दामले

भारताचे जग काबीज करण्याचे कौशल्य वेगळे आहे. अमेरिकेच्या उपाध्यक्ष कमला हॅरिस होत्या. सुंदर पिचाई अमेरिकेतल्या बलाढ्य गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. ऋषी सुनक ब्रिटनचे पंतप्रधान होते... जगावर प्रभाव निर्माण करण्यासाठी प्रत्येक वेळी लष्करी सामर्थ्याचीच गरज असते असे नाही. बुद्धिमत्ता, व्यापार, ज्ञान, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यातूनही जगाच्या नेतृत्वापर्यंत पोहोचता येते.

सर्वाधिक पुरस्कारांचा मानकरी ठरलेला दिवाळी अंक

सकाळ अवतरण


मूल्य २५०/- दिवाळी २०२६

इराण: पश्चिम आशियातील
नवे सत्ताकेंद्र



शानीर एन. सिद्दिकी

भारत-आखातातील देशांच्या संबंधांची कहाणी शतकानुशतके चालत आलेल्या सागरी व्यापारापासून ते जागतिक अर्थव्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय धोरणातील एका महत्त्वपूर्ण अध्यायापर्यंत विकसित झाली आहे. या भागीदारीची सर्वांत मोठी ताकद सरकारी करारांमध्ये किंवा अब्जावधी डॉलर्सच्या गुंतवणुकीत नसून, दोन्ही प्रदेशांशी जोडल्या गेलेल्या लोकांच्या जीवनात आहे.



भारत-आखाती
संबंधांचे
नवे पर्व



आमीर अली

अमेरिकेच्या हस्तक्षेपाविरोधात सातत्याने संघर्ष करताना पश्चिम आशियाची नव्याने व्याख्या करण्याची क्षमता असलेला इराण देश एक भूराजकीय विसंगती आहे. अमेरिकाप्रणीत सत्ताव्यवस्थेला आव्हान देत इराणने स्वतंत्र सत्ताकेंद्र म्हणून आपले स्थान निर्माण केले आहे. इराणकडे केवळ संघर्षग्रस्त राष्ट्र म्हणून नव्हे; तर बदलत्या जागतिक व्यवस्थेतील एक महत्त्वाचा भूराजकीय घटक म्हणून पाहणे आवश्यक आहे.

राज्यभर उपलब्ध

आपली प्रत आजच राखून ठेवा...

बुकिंगसाठी संपर्क ९८८१५९८८१५